**करोना २०२०/सुचना/आदेश क्रमांक - ३८**


**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग**
**हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१**
❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖


क्रमांक : साशा कार्या/ब-५/करोना-२०२० दिनांक :१६/०३/२०२०.

वाचले:- १.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०

२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०

३. साथ रोग अधिनियम १८९७.

---

**आदेश,**

शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.१ अन्वये अधिसुचना प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

उपोद्घातातील अनुक्रमांक १ मधील नियम १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी संबधित जिल्हाधिकारी त्यांचे कार्यक्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून गर्दीची क्षेत्रे प्रतिबंधीत करु शकेल.

रायगड जिल्हयातील मौजे चौक, ता.कर्जत येथील एन.डी.स्टुडिओ हे मोठया प्रमाणात गर्दीची क्षेत्र असल्याने व सद्यस्थितीत देशातील करोना विषाणुचा संसर्ग होण्याची शक्यता असल्याने, मी जिल्हाधिकारी रायगड मला प्राप्त अधिकारानुसार रायगड जिल्हयातील मौजे चौक, ता.कर्जत येथील एन.डी.स्टुडिओ दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत नागरीकांना प्रवेशासाठी बंद ठेवण्याबाबत आदेशीत करीत आहे.

सदरच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पुर्तता अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा दंडाधिकारी**
**रायगड अलिबाग**

प्रत:- मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांना माहितीसाठी.
प्रत:- पोलीस अधिक्षक रायगड अलिबाग यांना माहीतीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
प्रत:- उपविभागीय अधिकारी, कर्जत यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत:- जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड अलिबाग यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
प्रत : जिल्हा माहीती अधिकारी यांना जाहीर प्रसिद्धीसाठी
प्रत:- तहसिलदार कर्जत / खालापूर
२/- सदर आदेशाची अमंलबजावणी तात्काळ करुन अहवाल सादर करावा.
प्रत:-
प्रत : मॅनेजर, एन.डा.स्टुडओ, ता.कर्जत जि.रायगड यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा दंडाधिकारी**
**रायगड अलिबाग**